# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**

**(formerly University of Pune)**

**विद्यापीठ अधिकार मंडळांच्या निवडणुकींसाठी महाविद्यालयीन/परिसंस्थांतील अध्यापक, विद्यापीठ अध्यापक आणि महाविद्यालयीन/परिसंस्थातील विभागप्रमुख या मतदारसंघांच्या अंतिम मतदार याद्या प्रसिध्द करणेबाबत**

**<u>जाहीर प्रकटन</u>**

**संदर्भ क्र. १ : साफुपुविनि/१८, दिनांक १८ जून, २०२२**
**संदर्भ क्र. २ : महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले सन २०१७ चे एकरुप परिनियम क्र. १(८)**
**संदर्भ क्र. ३ : साफुपुविनि/९२, दिनांक १४ सप्टेंबर, २०२२**
**संदर्भ क्र. ४ : साफुपुविनि/९४, दिनांक १६ सप्टेंबर, २०२२**
**संदर्भ क्र. ५ : साफुपुविनि/२०९, दिनांक २६ नोव्हेंबर, २०२२**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(द)[28(2)(r)] अन्वये महाविद्यालयीन/परिसंस्थांतील **१० अध्यापक** आणि कलम २८(२)(ध)[28(2)(s)] अन्वये **०३ विद्यापीठ अध्यापक** अधिसभेवर तसेच कलम ३२(३)(छ)[32(3)(g)] अन्वये प्रत्येक विद्याशाखेचे **०२ अध्यापक** विद्यापरिषदेवर व ४०(२)(ग)[40(2)(c)] अन्वये महाविद्यालयीन/परिसंस्थांतील **०३ विभागप्रमुख** प्रत्येक अभ्यासमंडळावर निवडून द्यावयाचे आहेत. याकरिता मतदार नोंदणी करण्यासाठी संदर्भ क्र. १ अन्वये ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते. संदर्भ क्र. २ अनुसार तयार करण्यात आलेल्या उक्त नमूद मतदारसंघाच्या तात्पुरत्या मतदार याद्या तसेच अपात्र ठरलेल्या अर्जांच्या याद्या (कारणासहित) संदर्भ क्र. ३ अन्वये प्रसिध्द केल्यानंतर त्याअनुषंगाने संदर्भ क्र. ४ अन्वये संबंधितांकडून निवडणूक विभागात विहित मुदतीमध्ये प्राप्त झालेल्या हरकती विचारात घेवून संदर्भ क्र. ५ अन्वये दुरुस्त मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली. दुरुस्त मतदार यादी संदर्भात विहित मुदतीमध्ये दाखल केलेल्या अपीलांबाबत निर्णय घेवून संदर्भ क्र. २ अनुसार तयार करण्यात आलेल्या उक्त नमूद मतदारसंघाच्या अंतिम मतदार याद्या विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर या प्रकटनाद्वारे प्रसिध्द करण्यात येत आहेत, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/२४७
दिनांक : ०६/१२/२०२२